MHKO100004442024

## नियमीत दिवाणी दावा क्र.६८/२०२४ मधील निशाणी क्र.१५ वर आदेश

## ( सौ. सुशिला शिंदे वि. लक्ष्मण् एकसंबे )

प्रतिवादी नं.४ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत विना म्हणणे" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदर कामातील कागदपत्रे व माहिती लवकर उपलब्ध न झालेने त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुतचा वाद स्थावर मिळकतीशी निगडीत असल्याने तो गुणदोषावर निर्णीत होणे गरजेचे आहे. कैफियत व म्हणणे दाखल करून घेतल्यास वादीचे काही नुकसान होणार नाही याउलट प्रतिवादीचे फार मोठे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी यांना न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे.

२. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा प्रतिवादी नं. ४ नी दिलेला अर्ज रक्कम रूपये ५०००/- कॉस्ट देणेच्या अटीवर मंजूर करणेत यावा.

३. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

४. वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीस दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर न्यायालयात दिनांक ०३/०५/२०२४ रोजी हजर झाला. प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत कैफियत व म्हणणे दिले नाही म्हणून त्यांच्याविरूध्द दिनांक ०८/०८/२०२४ रोजी

कैफियत व म्हणणे नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक १८/१०/२०२४ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादीने सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादीची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादीची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादीचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादीने आपली कैफीयत व म्हणणे दाखल करण्यास बराच उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादीने केलेल्या उशीराबाबत त्यांच्यावर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आ दे श

१) प्रतिवादी नं. ४ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची निशाणी १५ च्या अर्जासोबत दिलेली कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.13 13:06:46 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १०/०३/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज